**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

उद्योग सारथी
महाकाली गुंफा मार्ग,
मरोळ, अंधेरी (पूर्व),
**मुंबई - ४०० ०९३**

**क्र.मऔविम/विधी व कामकाज विभाग/** ८२ **/२००९** **दिनांक :** २९/०६/२००९

# परिपत्रक

**विषय : प्रक्रिया शुल्क व हस्तांतर शुल्काच्या दरात सुधारणा**

महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड, शेड, गाळा इत्यादी वाटपासाठी उद्योजकांकडून अर्ज प्राप्त होत असतात, त्यावेळी "प्रक्रिया शुल्क" आकारण्यात येते. तसेच, भूखंड, शेड, गाळा इत्यादी औपचारीक हस्तांतर प्रकरणात "हस्तांतर शुल्क" आकारण्यात येते.

भूखंड, शेड, गाळा इत्यादी वाटपासाठी तसेच औपचारीक हस्तांतरासाठी प्राप्त होणा-या अर्जामध्ये वाढ होत आहे. तसेच भूखंड, शेड, गाळा हस्तांतरासाठी सादर केलेले प्रस्ताव मागे घेण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. त्यामुळे, भूखंड, शेड, गाळा हस्तांतर प्रकरणी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर महामंडळाने केलेली कार्यवाही व वेळ वाया जातो व अशा प्रवृत्तीस आळा घालण्याच्या दृष्टीने सदर अर्जासोबत नापरतीचे प्रक्रिया शुल्क आकारणे, तसेच भूखंड, शेड, गाळा इत्यादी वाटपासाठी प्राप्त होणा-या अर्जासोबत घेण्यात येत असलेल्या प्रक्रिया शुल्कात व भूखंड, शेड, गाळा इत्यादी हस्तांतर करत असताना आकारण्यात येत असलेल्या हस्तांतर शुल्कात सुधारणा करण्याची आवश्यकता वाटल्याने, सदर शुल्कात सुधारणा करण्याची बाब महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०८/०४/२००८ रोजी झालेल्या ३२० व्या सभेत सादर करण्यात आली होती. सदर, बाबीवर चर्चा होऊन ठराव क्र.४५५६ पारीत करण्यात आला. तथापि, सदर ठरावात सुधारणा करणे आवश्यक वाटल्याने त्या संदर्भातील बाब पुन:श्च दिनांक २१/१०/२००८ व २३/१०/२००८ रोजी झालेल्या सभेत सादर करण्यात आली होती व सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र.४६५९ पारीत करण्यात आला असून त्या अनुषंगाने, खालील प्रमाणे प्रक्रिया / हस्तांतर शुल्क आकारावयाचे आहे :

**अ) भूखंड, शेड, गाळा इत्यादी वाटपासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जासोबत खालील प्रमाणे "नापरतीचे प्रक्रिया शुल्क" आकारण्यात यावे:**

| अ.क्र. | मागणी केलेले क्षेत्र | भूखंड, शेड, गाळा वाटपासाठी प्रक्रिया शुल्क |
|---|---|---|
| १ | १०,००० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडासाठी | रु.२,०००/- |
| २ | १०,००१ ते २०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडासाठी | रु.४,०००/- |
| ३ | २०,००१ ते ४०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडासाठी | रु.५,०००/- |
| ४ | ४०,००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडासाठी | रु.१०,०००/- |

**ब) भूखंड, शेड, गाळा इत्यादी हस्तांतर प्रकरणी "हस्तांतर शुल्काचे" दर खालील प्रमाणे सुधारीत करण्यात आले आहेत.**

| अ.क्र. | वर्गवारी | हस्तांतर शुल्क |
|---|---|---|
| १ | अ | रु.२५/- प्रति चौ.मी. (कमीतकमी रु.२५,०००/-) |
| २ | ब | रु.२०/- प्रति चौ.मी. (कमीतकमी रु.२०,०००/-) |
| ३ | क | रु.१५/- प्रति चौ.मी. (कमीतकमी रु.१५,०००/-) |
| ४ | ड | रु.१०/- प्रति चौ.मी. (कमीतकमी रु.१०,०००/-) |
| ५ | ड+ | रु.५/- प्रति चौ.मी. (कमीतकमी रु.५,०००/-) |